# आशा स्वयंसेवकांची ग्रामीण आरोग्यासंदर्भातील भूमिका आणि महत्व

**डॉ. आनंद माधवराव वाघ,**
सहयोगी प्राध्यापक,
आजीवन शिक्षण व विस्तार विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

***गोषवारा:***

*भारतात ग्रामीण असो की शहरी भाग त्यामध्ये आरोग्याच्या संदर्भातील समस्या ह्या कायम आहेत. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे कमी प्रमाण व आजही अंधश्रद्धा असल्याने आरोग्याची काळजी व्यवस्थित होत नाहीत, त्याचबरोबर काही प्रमाणात आजारावर विलाज करण्यासाठी काही प्रमाणात अंधश्रद्धांची मदत आजही घेतली जात असल्याचे दिसून येते. या सर्व बाबींचे अथवा समस्यांचे काही प्रमाणात निरसन करण्यासाठी ग्रामीण भागात शासनाने ग्रामीण आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्राथमिक किंवा स्थानिक स्तरावर 'आशा' या स्वयंसेवकांची निर्मिती केली आहे. आज यांच्यामार्फत ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य संदर्भातील समस्यांचे प्राथमिक उपायासाठी सहाय्यभूत केले जात आहे.*

**प्रस्तावना:**

आरोग्य सेवांची सुरुवात भारतामध्ये अठराव्या शतकाच्या मध्यावर झाली. "एकविसाव्या शतकात आरोग्याचे महत्त्व नव्याने सांगायला नको. हिंदू धर्मामध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. या सर्व बाबींचे मूळ हे मानवाचे आरोग्य चांगले असल्यावर आहे. चांगले आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक रोगांपासून मुक्त असणे होय. वैदीक काळामध्ये देखील मानवी आरोग्याला अनन्यसाधारण अशा स्वरूपाचे महत्त्व देण्यात आले आहे."[१]

"भारतीय लोकशाही राष्ट्र प्रणालीने सर्व नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे. आरोग्य हा प्रत्येक माणवाचा हक्क आहे. आरोग्य सेवा सर्वांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, या तत्त्वांच्या पूर्ततेसाठी भारत कटिबद्ध आहे"[२]. इ.स.१९७८ मध्ये रशियामधील जागतिक आरोग्य परिषद भरली होती, त्यामध्ये इ.स.२००० पर्यंत 'सर्वांना आरोग्य' ही संकल्पना मांडण्यात आली होती. तसेच संबंधित संकल्पना भारतानेही मान्य केली होती. त्यामुळे भारत सरकारने देशातील आरोग्याचा दर्जा वाढवण्यासाठी वेगवेगळ्या आरोग्याच्या संबंधित योजना व सेवा सुविधा निर्माण केल्या आहेत. त्यामध्ये "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान" च्या अंतर्गत "आशा" स्वयंसेविका योजना २००५ मध्ये सुरू करण्यात आली. आशा स्वयंसेविका ही ग्रामीण व आदिवासी भागातील माता व बालमृत्यू दर कमी करणे, आरोग्यविषयक शासकीय योजनांची माहिती लोकांना पुरविणे व इतर आरोग्याच्या संदर्भात इतर सेवा देण्याचे कार्य करते.

**संशोधनाचे उद्देश:**

1) ग्रामीण भागातील माता व बालकांच्या आरोग्य समस्यांवर आशा स्वयंसेविकाच्या कार्याचा प्रभाव याचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण आरोग्य व आशा स्वयंसेविका यांचा संबंध अभ्यास

३) माता व बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्याची आशा स्वयंसेविकेची असलेली भूमिका याचा अभ्यास करणे.

"आज खऱ्या भारताचे दर्शन ग्रामीण भारतातच घडते, असे महात्मा गांधींचे म्हणणे होते. भारतातील लोकसंख्येच्या जवळपास ८०% लोक ग्रामीण भागात राहतात. या ग्रामीण भागातील लोकांच्या विकास म्हणजेच खऱ्या अर्थाने भारताचे विकास होय. ग्रामीण भागात राहणीमान अत्यंत गैरसोयीचे असून तेथे सकस व योग्य तेवढी शक्ती देणा-या आहाराचा तुटवडा आहे. पिण्यासाठी शुद्ध पाणी पुरवठा देखील नाही. भारताचे दरडोई वार्षिक उत्पन्न कमी आहे व लोकसंख्या वाढत आहे. ग्रामीण भागातील निरक्षरतेमुळे दारिद्र्य अज्ञान यांच्या परिणामी कुपोषण मोठ्या प्रमाणावर वाढते".[3]

**आशा स्वयंसेविका व ग्रामीण आरोग्य:**

भारतामध्ये "ग्रामीण आरोग्याच्या सुधारणेसाठी 'रुरल हेल्थ मिशन' या नावाने एक मोहीम आखली आहे. त्या अंतर्गत स्त्री आरोग्यदूतांच्या धर्तीवर आरोग्यसेविका नेमण्याची ठरवले आहे. "आशा" हे तिचे नाव".[४] एकूणच ग्रामीण भागातील महिलांच्या म्हणजेच माता व बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व सहाय्यक मार्गदर्शक म्हणून शासनाने या 'आशा' स्वयंसेविकेची नेमणूक गावागावात केली आहे. ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य विषयीच्या शासकीय योजना/सेवा व सुविधांची माहिती व सेवा पुरविण्याचे कार्य आशा स्वयंसेविका (ASHA) Accredited Social Health Activist करतात.

"ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा यशस्वीरीत्या आणि सातत्याने मिळाव्यात यासाठी शासकीय पातळीवर, अनेक कार्यक्रम राबविले जातात. प्रामुख्याने मातांच्या सेवा, बालकांच्या आरोग्यसेवा, कुटुंब कल्याण, पौंगडावस्थेतील आरोग्यसेवा, सामाजिक आरोग्य, विविध आरोग्यसेवा, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, तालुका या पातळीवर दिल्या जातात. यामध्ये आशा स्वयंसेविकांना प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र स्तरावरून कोणकोणत्या सेवा कोणाकडून कुठे मिळतात हे माहिती करून घेऊन त्याबद्दल लोकांना माहिती देणे. "आरोग्य सेवा मिळण्यापासून वंचित राहिलेल्या गरोदर मातांना शोधून काढणे, उदा. गावापासून दूर राहत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील असलेला बाहेरून आलेल्या, तसेच मागासवर्गीय जाती, जमातींमधील गरोदर स्त्रियांना आरोग्यसेवा देणे".[५] तसेच विविध सांसर्गिक व असांसर्गिक आजारांवर उपचार घरी करणे शक्य होणार नाही. तसेच आशा ही स्थानिक रहिवासी असल्याने स्त्री आरोग्यदूत म्हणून आरोग्य संदेश समाजात सहज रुजवू शकेल. 'आरोग्य संवर्धन, विविध प्रतिबंधक व उपचारात्मक उपाययोजना तसेच समाजामध्ये जाणीव जागृती वृद्धिंगत करणे, यामध्ये 'आशा' स्वयंसेविकेची महत्त्वाची भूमिका आहे. आरोग्य सेवा व आरोग्य संस्थांची माहिती सर्व लोकांपर्यंत उपलब्ध करून देणे. आरोग्य सेवा सुविधांचा लाभ घेण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करणे, आरोग्याबद्दल लोकांमध्ये मानसिक व सामाजिक बदल घडविणे आदी कामे आशा स्वतः करते आहे.'[६]

महाराष्ट्रामध्ये 'आशा' ही योजना २००७ पासुन लागू केलेली आहे. सुरुवातीस ही योजना फक्त आदिवासी भागात होती. २००९ पासुन ती ग्रामीण भागातही ही योजना २००७ पासुन लागू झालेली आहे. लवकरच शहरी भागात

आरोग्य कार्यकर्ता नेमल्ये जातील. मात्र त्यांना 'आशा' ऐवजी 'उषा' असे नाव असेल. NAHM च्या माध्यमातून गावपातळीवर आशा आरोग्य स्वयंसेविकेचे खूप महत्त्व आहे.

**आशा स्वयंसेविकेच्या जबाबदारी:**

1) माता व बाल आरोग्याविषयी प्रबोधन करणे.
2) जन्म-मृत्युच्या नोंदणीमध्ये मदत.
3) वेळोवेळी शासनाच्या सूचनेनुसार कार्य.
4) मलेरिया, कुष्ठरोग उपचारांसाठी मदत करणे.

**समारोप:**

या योजनेअंतर्गत माता व बालकांना विविध सेवा सुविधा दिल्या जात आहेत, जसे की लसीकरण, आरोग्य शिक्षण, प्राथमिक आरोग्यसेवा, ग्रामीण भागांमध्ये आरोग्य सेवा देण्यामध्ये आशा स्वयंसेविकांची महत्त्वाची भूमिका आहे. स्वच्छता, खानपान, राहणीमान, गरोदरपणातील घ्यायची काळजी, लसीकरण, रोगप्रतिबंध इत्यादी बाबतीत, अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून अनेक आरोग्य सेवा देण्याचे कार्य आशा स्वयंसेविका करतात. तसेच लोकांमध्ये आरोग्य सेवांची माहिती प्रत्यक्ष त्यांना ती सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे कार्य आशा स्वयंसेविका करतात.

**संदर्भ ग्रंथ:**

1. लिमकर सुधाकर पांडुरंग, (२००५) 'आरोग्य संवाद", संवाद प्रकाशन, औरंगाबाद. पृ.क्र.५.
2. 'जनवैद्यक भारतातील आरोग्य परिस्थिती संघटक (१९९०),' हॅलो वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद. पृ.क्र.४.
3. आंबुलगेकर रामदास, (१९८७) 'वैद्यकीय समज-गैरसमज', कैलास पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.७०.
4. कुलकर्णी सुहास, (२००८) 'खरेखुरे आयडॉल्स', युनिक फीचर्स, समकालीन प्रकाशन, पृ.क्र.१७.
5. आशा कार्यक्रम पुस्तिका क्र. २, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, पृ.क्र.१६.
6. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, (२००८-०९), 'आशा स्वयंसेविका योजना', बिगर आदिवासी क्षेत्रात आशा स्वयंसेविका नियुक्तीबाबत, मार्गदर्शक सूचना, पृ.क्र.९.